।। श्री ।।

**खरेदीखत** किंमत रूपये रूपये मात्रचे मौजे **वलवाडी** येथील धुळे महानगर पालिका हद्दीतील **जी के मार्केट फेज १** मधील **दुकान नं.१** ची दिनांक १२/०५/२०२२

१) **लिहुन घेणार.....**

१) **श्री. गोपाळ काशिनाथ केले**

उ.वय - ७० धंदा - शेती व व्यापार

**स्वत: करीता व लिहुन देणार नं. २ व ३ यांचे जनरल मुखत्यार म्हणुन**

२) **श्री. प्रितेश गोपाळ केले**

उ.वय - ४१ धंदा - व्यापार

३) **श्री. प्रणेश गोपाळ केले**

उ.वय - ३९ धंदा - व्यापार

सर्व रा. गजानन महाराज मंदिर रोड,

नेताजी ग्राऊंड शेजारी, देवपुर धुळे. **लिहुन देणार.....**

कारणे खरेदीखत लिहुन देतो की, माझे मालकीची ताबे उपभोगातील वहीवाटीत असलेली **जी के मार्केट फेज १** मधील **दुकान नं.** तु.जि. धुळे, पो.तु.ता. धुळे पैकी.

**मौजे वलवाडी येथील**

स.नं. **१३३/२** ही शेतजमीन **मे.जिल्हाधिकारी सो. धुळे** यांचेकडील ऑर्डर नं. **ब/कक्ष-१/बिनशेती/एन.ए.एस.आर/६६/१३** दिनांक **१७/१०/२०१५** अन्वये महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६७ चे कलम ४६ अन्वये रहीवास कामाकरीता बिनशेतीकडे वर्ग झालेली असुन सदर जमीनीचा ले-आऊट प्लॅन हा **मे. नगर रचनाकार धुळे** यांचेकडील पत्र नं. **नरधु/अभिन्यास/मौजे वलवाडी ता. धुळे/गट नं. १३३/२/८२** दिनांक **१५/०१/२००५** मंजुर झालेला आहे. त्या मंजुर प्लॅन प्रमाणे तुम्हास कायम खरेदी दिली ती माझे मालकीची बांधीव दुकान त्याचे वर्णन -

मौजे वलवाडी येथील स.नं. १३३/२ पैकी प्लॉट नं. १ चे एकुण क्षेत्र २३९ चौरस मीटर यातील जी के मार्केट फेज १ मधील दुकान नं. १ याचे क्षेत्र ६.२३ चौरस मीटर बिल्टअप एरीया यांसी मापे व चतु:सिमा -

| यासी | चतु:सिमा |
|---|---|
| पुर्वेस - | प्लॉट नं. १ चा उर्वरीत भाग |
| पश्चिमेस - | प्लॉट नं. १ चा उर्वरीत भाग |
| दक्षिणेस - | प्लॉट नं. १ चा उर्वरीत भाग |
| उत्तरेस - | दुकान नं. २ |
| वर - | सदनिका नं. १ |
| खाली - | तळजमीन |

**सदर मिळकतीचे जनरल मुखत्यार हे मे. दुय्यम निबंधक साहेब धुळे - ३ यांचेकडे दिनांक ०९ मे २०२२ दस्त नंबर २१९५/२०२२ अन्वये नोंदविले आहे.**

येणे प्रमाणे चतु:सिमेचे आतील बांधीव मिळकतीमध्ये दुकान, शटर, इलेक्ट्रीक फिटींग सह तसेच तळ, दगड, माती, तळजमीन, वगैरे निधीनिक्षेप तदंगभुत वस्तु आज रोजी तुम्हास कायमचे पक्के खरेदी देऊन तुमचे कबजात दिले आहे. कबजाबद्दल काही तक्रार राहिली नाही. तीचा तुम्ही पाहिजे तसा वंशपरंपरा मनमानेल तसा मालकी हक्काने उपभोग घेणेस अगर कोठे गहाण, खरेदी, बक्षीस वगैरे देणेस पुर्णपणे मालक झाले आहात.

आता या विक्री केलेल्या बांधीव दुकानावर माझा व माझे इस्टेट वारस भाऊबंध नातलग यांचा कोणाचा कोणत्याही प्रकारचा मालकी हक्क दावा हितसंबंध राहिला नाही. तसा कोणीही काही हक्क हितसंबंध वगैरे दाखवुन काही दावा वगैरे केल्यास त्याचे निवारण मी माझे पदर खर्चाने करून देईल. त्याची तोषीश तुम्हास लागु देणार नाही.

विक्री केलेले बांधीव दुकान मी कोठे गहाण, खरेदी, बक्षीस वगैरे दिलेली नाही व त्यावर कोणाचीही टांच जप्ती वगैरे नाही व कोठे तोंडी अगर लेखी करार मदाराने दिलेली नाही व त्यावर कोणाचाही अन्नवस्त्राचा बोजा हक्क वगैरे नाही अन्य कोठल्याही जड जोखमात नाही. तसेच मे. कोर्टात या बांधीव दुकानासंबंधी टांच नाही वा जप्ती नाही, सरकारी वा खाजगी स्वरूपाचे कर्ज बोजे नाही, दुसरे कोणाशीही तोंडी अथवा लेखी सौदा अगर करार

केलेला नाही, कोर्ट कचेरी चालु नाही, सदर बांधीव दुकानावर राष्ट्रीयकृत बँक अगर खाजगी बँक, पतसंस्था वगैरेचा कर्ज बोजा नाही, तारण नाही, मनाई हुकुम नाही तसेच या बांधीव दुकानासंबंधी अन्य दुसरे कोणास लिजडीड, मृत्युपत्र, जनरल मुखत्यारपत्र वगैरे लिहुन दिलेले नाही तसे निघाल्यास आणि तुमचे कबजा व मालकी हक्कास कोणत्याही रितीने बाधा आल्यास त्याचे निवारण मी माझे पदर खर्चाने करून देईल त्याची तोषिस तुम्हास लागु देणार नाही.

विक्री केलेल्या बांधीव दुकानाचा आज तागायतचा सरकारी महसुल मी भरला आहे यापुढे तुम्ही भरीत जावा. तसेच अन्य सरकारी अथवा खाजगी थकबाकी वगैरे निघाल्यास त्याचे निवारण मी माझे स्वखर्चाने करून देईन.

**भरणा मिळाला तो खालील प्रमाणे**

**रू. /-**

**रू. /-** ' या प्रमाणे भरणा मिळाला. भरण्याची तक्रार राहीली नाही.

सदरचे खरेदीखत लिहुन देणार व लिहुन घेणार यांनी सांगीतल्याप्रमाणे व दिलेल्या माहितीप्रमाणे बरोबर लिहुन दिले असुन ते आम्हांला वाचुन मान्य व कबुल आहे.

हे खरेदीखत आम्हाला व आमचे इस्टेट वारसांना बंधनकारक आहे व राहिल. याप्रमाणे हे खरेदीखत घरी आम्ही पंचासमक्ष ठरले प्रमाणे राजीखुशीने लिहुन दिले.

साक्षीदार लिहुन देणार

१)

२) लिहुन घेणार